# राजयोग

स्वामी विवेकानंद

अनुवाद

सुशीला दुबे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**राजयोग :** स्वामी विवेकानंद
अनुवाद : सुशीला दुबे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
सुशीला दुबे
फ्लॅट नं. ३०३, बिल्डिंग नं. डी २,
शिवसागर को-ऑप. सोसायटी, माणिक बाग,
सिंहगड रोड, पुणे- ४११०५१
फोन नं. : ९९२३०११६१३

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# प्रस्तावना

जगाच्या आरंभापासून वर्तमान काळापर्यंत मानव समाजात अनेक अलौकिक घटना घडल्याचा उल्लेख बघायला मिळतो. आजसुद्धा जो समाज आधुनिक विज्ञानाच्या युगात राहत आहे त्यांच्यात अशा घटनांची साक्ष देणाऱ्या लोकांची उणीव नाही. पण असे पुरावे विश्वसनीय नाहीत. कारण ज्या व्यक्ती असे साक्षीपुरावे देतात त्यांच्यापैकी बहुतेक अज्ञानी आहेत. अंधविश्वासू किंवा धूर्त आहेत. बरेच वेळा असंही दिसून येतं की हे लोक ज्या घटनांना अलौकिक म्हणतात त्या वास्तविक नक्कल असतात. पण प्रश्न असा आहे की कशाची नक्कल? पुरेसं संशोधन केल्याशिवाय एखाद्या गोष्टीचा प्रचार करणं, सत्यप्रिय वैज्ञानिक मनाचा परिचय देत नाही. जे वैज्ञानिक सूक्ष्मदर्शी नाहीत ते काल्पनिक अलौकिक घटनांची व्याख्या करण्यात असमर्थ ठरतात. म्हणून ते त्या घटनांचं अस्तित्व नाकारण्याचा प्रयत्न करतात. हे लोक त्या लोकांपेक्षा जास्त दोषी आहेत जे समजतात की ढगांच्या पलीकडे कोणी महापुरुष किंवा बरेचसे पुरुष असतात. ते त्यांची प्रार्थना ऐकतात. त्याला उत्तरही देतात. किंवा ज्या लोकांचा असा विश्वास आहे की हे पुरुष त्यांच्या प्रार्थनेमुळे विश्वाचे नियम बदलतील. या लोकांबद्दल असे म्हणता येईल की हे अज्ञानी आहेत. किंवा त्यांना योग्य शिक्षण मिळालेलं नाही. त्यांना अशा अलौकिक पुरुषावर विश्वास ठेवण्याची शिकवण दिली गेली. आता त्या विश्वासावर अवलंबून राहणं त्यांचा स्वभाव बनला आहे. पण आधीच्या लोकांबद्दल असं म्हणता येणार नाही.

हजारो वर्षांपासून लोकांनी अशा अलौकिक घटनांचं निरीक्षण केलं आहे. त्यातून काही सामान्य निष्कर्ष काढले आहेत. माणसाच्या धर्मप्रवृत्तीच्या आधारभूमीचाही अतिशय बारकाईने विचार केला गेला आहे. या सगळ्या चिंतनाचं आणि विचारांचं फळ ही राजयोग-विद्या आहे. राजयोग वैज्ञानिकांच्या पद्धतीचा अवलंब करत नाही. त्यांच्यासारखं ज्या घटनांची व्याख्या करता येत नाही त्या उडवून लावत नाही. उलट अंधविश्वासू व्यक्तींना स्पष्टपणे दाखवून देतो की अलौकिक घटना, प्रार्थना सफल होणं, विश्वासाची शक्ती हे सगळं सत्य आहे. पण

हे सगळे व्यापार ढगापलीकडे बसलेल्या व्यक्ती करतात अशी अंधविश्वासपूर्ण व्याख्या करून त्याचं स्पष्टीकरण होत नाही. राजयोग शिकवण देतो की जसं माणसाच्या मनात वासना आणि उणिवा असतात तसंच मनात त्या उणिवा दूर करण्याची शक्तीसुद्धा आहे. जेव्हा एखादी वासना, उणीव, प्रार्थना पूर्ण होते तेव्हा समजावं की ती त्या अनंत भांडारातूनच पूर्ण झाली आहे. कोण्या अलौकिक पुरुषाकडून नाही. अलौकिक पुरुषाची कल्पना माणसाच्या कार्यशक्तीला काही प्रमाणात उत्तेजन देते, पण त्यामुळे आध्यात्मिक अवनतीसुद्धा होते. त्यामुळे विचारस्वातंत्र्य नाहीसं होतं. मनावर भीती आणि अंधविश्वासाचा पगडा बसतो. 'मनुष्य स्वभावानेच दुर्बल प्रकृतीचा आहे.' असा विचार आमच्या मनात घर करू लागतो. योगी म्हणतात, अनैसर्गिक असं काही नसतं. नैसर्गिकमध्ये दोन प्रकारच्या अभिव्यक्ती असतात. एक स्थूल आणि दुसरी सूक्ष्म. सूक्ष्म कारण आहे आणि स्थूल कार्य. स्थूल सहज उपलब्ध होऊ शकतं, पण सूक्ष्म नाही. राजयोगच्या अभ्यासाने सूक्ष्मतर अनुभूती मिळत राहते.

भारतात वेदमतावर आधारित तत्त्वज्ञान आहे. त्या सगळ्यांचं एकच ध्येय आहे. पूर्णत्त्वाची प्राप्ती करून आत्म्याला मुक्त करणं. त्यासाठी योग हा उपाय आहे. योग हा शब्द वेगवेगळे भाव व्यक्त करणारा आहे. सांख्य आणि वेदांत दोन्ही मतं कोणत्या ना कोणत्या प्रकारे योगाचं समर्थन करतात.

या पुस्तकाचा विषय आहे राजयोग. पातंजल सूत्र राजयोगाचं शास्त्र आहे आणि राजयोगावरचा सर्वोच्च प्रामाणिक ग्रंथ. इतर तत्त्वज्ञांनी लोकांचे काही तत्त्वज्ञानाच्या विषयात पतंजलींशी मतभेद होते. पण ते सुद्धा त्यांच्या उपासना पद्धतीला अनुमोदन देतात. पातंजल तत्त्वज्ञान सांख्य मतावर आधारित आहे. या दोन्ही मतात फारसा फरक नाही. यांचे मुख्य दोन प्रकार आहेत. पहिला, पतंजली आदिगुरूच्या रूपात एका सगुण ईश्वराची सत्ता स्वीकार करतात. सांख्यांचा ईश्वर पूर्णत्वप्राप्त एक व्यक्ती आहे जी काही काळ या सृष्टीवर राज्य करते. दुसरा, योगीगण आत्मा किंवा पुरुषासारखं मनालाही सर्वव्यापी मानतात. सांख्यमतवाले मानत नाहीत.

**– स्वामी विवेकानंद**

## प्रकरण एक

# प्रास्ताविक

आपलं सगळं ज्ञान अनुभवावर आधारित आहे. ज्याला आपण अनुमानाने मिळणारे ज्ञान म्हणतो, त्या ज्ञानाने आपण सामान्यापासून इतर ज्ञानापर्यंत आणि सामान्यापासून विशेष ज्ञानापर्यंत पोहोचतो. त्याचा आधार अनुभव आहे. ज्याला निश्‍चित शास्त्र म्हणतात त्याची सत्यता लोकांच्या सहज लक्षात येते. कारण ते प्रत्येकाला सांगतात की तुम्ही स्वत: पडताळून पाहा की ही गोष्ट सत्य आहे की नाही. वैज्ञानिक तुम्हाला कोणत्याही गोष्टीवर सहज विश्‍वास ठेवायला सांगणार नाहीत. त्यांनी स्वत: काही विषयांचा अनुभव घेतलेला असतो. त्याच्यावर विचार करून काही सिद्धांत काढलेले असतात. जेव्हा ते आपल्याला त्यांच्या सिद्धांतावर विश्‍वास ठेवायला सांगतात, तेव्हा त्याच्या खरेखोटेपणाचा निर्णय साधारण लोकांच्या अनुभवावर सोडतात. प्रत्येक शास्त्राला एक सामान्य आधारभूमी आहे. त्यापासून जे सिद्धांत मिळतात त्यांचा खरेखोटेपणा इच्छा असल्यास कोणीही समजून घेऊ शकतो. आता प्रश्‍न असा आहे की धर्माला अशी काही आधारभूमी आहे की नाही? साधे उत्तर देताना आपल्याला 'होय' आणि 'नाही' असे दोन्ही म्हणावे लागेल.

धर्माच्या बाबतीत साधारणपणे अशी शिकवण दिली जाते की धर्म फक्त श्रद्धा आणि विश्‍वासावर आधारलेला आहे. बहुतेक ठिकाणी तर तो वेगवेगळ्या मतांचा समुदाय आहे. हे मतसुद्धा विश्‍वासावर आधारित आहे. कोणी म्हणतात की, ढगांच्या पलीकडे एक महान पुरुष असतो. तोच सगळ्या विश्‍वावर राज्य करतो. वक्ते केवळ त्यांच्या सांगण्यावरून विश्‍वास ठेवायला सांगतात. माझ्या मनातसुद्धा अशा अनेक भाव-भावना असू शकतात. त्यावर विश्‍वास ठेवा, असं मी सांगू शकतो. जर त्यांनी विचारलं की आम्ही त्यावर विश्‍वास का ठेवावा तर त्यांना तर्कसंगत उत्तर देण्यास मी असमर्थ ठरतो. म्हणूनच आजकाल धर्म व तत्त्वज्ञानाची

इतकी निंदा होत आहे. प्रत्येक सुशिक्षित माणसाच्या मनात हाच भाव आहे की हा धर्म म्हणजे काही मतांचं गाठोडं आहे. त्याचं सत्यासत्य पडताळण्याचा काही मापदंड नाही. ज्याच्या मनात जे येईल तो ते बडबडतो. हे लोक काही का म्हणेनात वास्तविक धर्मावरील विश्वासाला एक सर्वसाधारण पाया आहे. वेगवेगळ्या देशातले वेगवेगळे पंथ, मतप्रवाह, सगळ्या प्रकारची धर्ममतं या पायावर उभी आहेत. सगळ्यांच्या मुळापर्यंत गेल्यास आपल्या असे लक्षात येते की, ते सगळे अनुभवावर आधारित आहेत.

पहिली गोष्ट अशी की, जर पृथ्वीवरील वेगवेगळ्या धर्मांचं विश्लेषण केलं तर एक गोष्ट लक्षात येईल की ते दोन श्रेणीत विभागलेले आहेत. काहींना शास्त्राचा आधार आहे. काहींना नाही. ज्यांना शास्त्राचा आधार आहे ते सुदृढ आहेत. त्या धर्मांना मानणाऱ्यांची संख्या जास्त आहे. ज्यांना शास्त्राचा आधार नाही ते धर्म जवळजवळ लुप्त झाले आहेत. काही नव्याने पुढे आले, पण त्यांचे अनुयायी फार थोडे आहेत. तरीही या सगळ्या संप्रदायांमध्ये एक मत आहे की ते प्रतिपादित असलेली सत्यं, विशिष्ट व्यक्तींचे प्रत्यक्ष अनुभवच आहेत.

ख्रिश्चन तुम्हाला त्यांच्या धर्मावर, येशूच्या अवतारावर, ईश्वर आणि आत्म्याच्या अस्तित्वावर, आत्म्याच्या होणाऱ्या उन्नतीवर विश्वास ठेवायला सांगतो. जर मी त्याला याचं कारण विचारलं तर तो म्हणतो, 'हा माझा विश्वास आहे.' जर तुम्ही ख्रिश्चन धर्माच्या मुळाशी गेलात तर तुम्हाला दिसून येईल की तो प्रत्यक्ष अनुभूतीवर स्थापित आहे. येशूने म्हटलं, ''मी ईश्वराचं दर्शन केले आहे' त्यांच्या शिष्यांनीही सांगितलं, 'आम्ही ईश्वराचे अनुभव घेतला आहे.'' वगैरे!

बौद्ध धर्माच्या बाबतीतही तसंच आहे. हा धर्म बुद्धाच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर स्थापित आहे. त्यांना काही सत्याचा अनुभव आला होता आणि त्यांनी जगात त्याचा प्रचार केला.

हिंदूंच्याबद्दलही अगदी असंच आहे. त्यांच्या शास्त्रात, ज्यांना ऋषी म्हणतात अशा ग्रंथकारांनी सांगितलं आहे, ''आम्ही काही सत्याचा अनुभव घेतला आहे.'' आणि त्याचाच त्यांनी प्रचार केला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की जगातले सगळे धर्म प्रत्यक्ष अनुभवावर स्थापित आहेत. ते अनुभव ज्ञानाची सार्वभौमिकता व सुदृढ पाया आहेत. सगळ्या धर्माचार्यांनी ईश्वराला पाहिलं होतं. त्या सगळ्यांनी आत्मदर्शन केलं होतं.

सगळ्यांनी अनंत स्वरूप जाणलं होतं, आपली भविष्यातील अवस्था पाहिली होती. त्यांनी जे पाहिलं त्याचाच त्यांनी प्रचार केला. फरक इतकाच आहे की त्यांच्यापैकी बहुतेक धर्म अलीकडे एक विचित्र दावा करतात की आता ते अनुभव घेणं असंभव आहे. धर्माचे जे प्रथम संस्थापक होते त्यांच्या नावाने धर्म प्रचलित झाला. अशा काही थोड्या व्यक्तींनाच प्रत्यक्ष अनुभव आला होता. आता असा अनुभव घेण्याचा काही मार्ग नाही. म्हणून आता धर्मावर विश्वास ठेवला पाहिजे. मला हे मान्य नाही. जर जगात ज्ञानाच्या प्रचाराचा एखाद्याने अनुभव घेतला आहे, तर त्यावरून असा सिद्धांत काढता येईल की, यापूर्वी अनेक वेळा त्याचा अनुभव येऊन गेला असेल. भविष्यात अनंत काळापर्यंत त्या अनुभवाची संभावना राहील. एकरूपता निसर्गाचा नियम आहे. एकदा जे घडलं ते पुन्हा घडू शकतं.

म्हणूनच योगविद्येचे आचार्य म्हणतात की धर्म पूर्वीच्या अनुभवावर आधारित आहे. हे अनुभव स्वत: घेतल्याशिवाय कोणी धार्मिक होऊ शकत नाही. ज्या विद्येने हे अनुभव मिळतात तिचं नाव योग आहे. धर्माच्या सत्याचा अनुभव घेतल्याशिवाय धर्माबद्दल बोलणं व्यर्थ आहे. देवाच्या नावावर जितका रक्तपात झाला तितका इतर कोणत्याही कारणाने झालेला नाही, असं का? कारण कोणीही धर्माच्या मुळापर्यंत गेलेलं नाही. सगळे लोक पूर्वजांच्या विचारांना अनुमोदन देऊन संतुष्ट होते. त्यांना वाटत होते की इतरांनीही तसंच करावं. ज्यांना आत्म्याची अनुभूती किंवा ईश्वराचा साक्षात्कार झाला नसेल त्यांना 'ईश्वर आहे, आत्मा आहे.' हे म्हणण्याचा काय अधिकार आहे? जर ईश्वर असेल तर त्याचा साक्षात्कार झाला पाहिजे. जर आत्मा असेल तर तो उपलब्ध झाला पाहिजे. अन्यथा त्यावर विश्वास न ठेवलेला बरा. ढोंगी होण्यापेक्षा स्पष्टवक्ता नास्तिक होणं जास्त चांगलं. एकीकडे स्वत:ला विद्वान म्हणवणाऱ्या लोकांचे भाव हे आहेत की धर्म, तत्त्वज्ञान आणि एका परम पुरुषाची कल्पना हे सगळं निष्फळ आहे. दुसरीकडे जे अर्धशिक्षित आहेत, त्यांच्या मते धर्म, तत्त्वज्ञान वगैरेंना वास्तविक काही आधार नाही. त्याचा एवढाच उपयोग आहे की जगाचं कल्याण करण्याची प्रेरक शक्ती निर्माण होते. जर लोकांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास असेल तर ते सत्य व नीतीवर चालणारे होतील. चांगले नागरिक होतील. ज्यांना असं वाटतं त्यांना दोष देता येणार नाही. कारण त्यांना धर्माबद्दल जी शिकवण दिली जाते ती फक्त अर्थहीन अनंत शब्दांच्या समुदायावर विश्वास ठेवण्याची असते. त्यांना शब्दावर विश्वास ठेवायला सांगितले

जाते. पण हे शक्य आहे का? जर माणसाला हे शक्य असेल तर माणसाच्या स्वभावावर माझी श्रद्धा राहिली नसती, माणसाला सत्य हवे असते. त्याला सत्याचा स्वत: अनुभव घ्यायचा असतो. वेद असं म्हणतात, सत्याचं आकलन झालं, प्रत्यक्ष पाहिलं, हृदयाच्या गाभ्यात त्याचा अनुभव आला की त्याच्या सगळ्या शंका दूर होतात. जीवनातला अंधार दूर होतो. वक्रता सरळ होते. वेद म्हणतात, ''हे अमृत पुत्रांनो, हे दिव्यधाममध्ये राहणाऱ्या देवतांनो ऐका, मला अज्ञानाच्या अंधकारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग सापडला आहे. जो सगळ्या अंधकाराच्या पलीकडे आहे, त्याला समजून घेतल्यावरच तिथे जाता येते. मुक्तीचा दुसरा कोणताही उपाय नाही.''

हे सत्य प्राप्त करण्यासाठी राजयोग विद्या मानवासमोर यथार्थ, व्यावहारिक, साधनोपयोगी, शास्त्रीय प्रणाली सादर करते. प्रत्येक विद्येच्या शोधांची व साध्य करण्याची प्रणाली वेगवेगळी असते. जर तुम्हाला खगोलशास्त्रज्ञ व्हायचं असेल आणि बसल्या बसल्या फक्त खगोलशास्त्रज्ञ खगोलशास्त्रज्ञ म्हणून ओरडत राहिलात तर तुम्ही कधी खगोलशास्त्रज्ञ होऊ शकणार नाही. रसायनशास्त्राच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. त्यातसुद्धा एका विशिष्ट क्रमाचे अनुसरण करावे लागते. प्रयोगशाळेत जाऊन, वेगवेगळी रसायनं घेऊन, त्यांना एकत्र करून योग्य प्रमाणात मिश्रण करून, नंतर त्याचं परीक्षण करावं लागतं. तेव्हा कुठे तुम्ही रसायनशास्त्रज्ञ होऊ शकता. जर तुम्हाला खगोलशास्त्रज्ञ व्हायचं असेल तर वेधशाळेत जाऊन दुर्बिणीतून ग्रह-ताऱ्यांचं निरीक्षण करून, त्याचं विश्लेषण करून निष्कर्ष काढावे लागतील, तरच तुम्ही खगोलशास्त्रज्ञ होऊ शकाल. मी तुम्हाला अनेक उपदेश देऊ शकतो पण तुम्ही स्वत: साधना केली नाही तर तुम्ही धार्मिक होऊ शकणार नाही. सगळ्या युगात, सगळ्या देशात निष्काम कर्मयोगी, साधू, महापुरुष या सत्याचा प्रचार करत आले आहेत. त्यांच्या मनात जगाच्या कल्याणाव्यतिरिक्त इतर कोणताही कामना नव्हती. या सगळ्यांनी असे सांगितले आहे की इंद्रियं जेवढ्या सत्याचा अनुभव करवू शकतात त्याहून उच्च सत्य आम्ही प्राप्त केले आहे. तुम्ही परीक्षा घेऊन पाहा आणि मगच विश्वास ठेवा. ते असे सांगतात की तुम्ही एक साधन प्रणाली घेऊन सरळ भावनेने साधना करत राहा आणि जर हे उच्च सत्य प्राप्त झाले नाही तर तुम्ही म्हणू शकता की उच्चतर सत्याबद्दलच्या गोष्टी कपोलकल्पित आहेत. पण त्याआधी या म्हणण्याच्या

सत्यतेचा अस्वीकार करणे योग्य नाही, म्हणून विशिष्ट साधनप्रणाली घेऊन श्रद्धापूर्वक साधना करणे आवश्यक आहे. तरच प्रकाश येईल.

काही गोष्टींचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आपण सामान्यीकरणाची मदत घेतो. सामान्यीकरण घटनांच्या प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारलेले असते. आपण अगोदर घटनेचे निरीक्षण करतो. मग तिचे सामान्यीकरण करतो व त्यातून आपले सिद्धांत काढतो. जोपर्यंत आपण हे प्रत्यक्ष करून घेत नाही जोपर्यंत आपण हे समजून घेत नाही की आमच्या मनात काय चालले आहे, काय नाही. तोपर्यंत आपण आपल्या मनाबद्दल, माणसाच्या अंत:प्रकृतीबद्दल, विचाराबद्दल काही समजू शकत नाही. बाहेर घडणाऱ्या गोष्टींचे निरीक्षण करणे सोपं आहे. कारण त्यासाठी अनेक उपकरणे निर्माण झाली आहेत. पण अंतर्जगताचे व्यापार समजून घेण्यात मदत करणारे उपकरण उपलब्ध नाही. तरीही आपण जाणतो की कोणत्याही विषयाचे यथार्थ ज्ञान प्राप्त करण्यासाठी निरीक्षण आवश्यक आहे. योग्य विश्लेषणाशिवाय विज्ञान निरर्थक-निष्फळ होते. आधारहीन तर्क होते. म्हणूनच ज्यांनी निरीक्षणाचे उपाय जाणून घेतले आहेत, असे थोडे मानसशास्त्रज्ञ सोडून बाकी सगळे अनंत काळापासून आपआपसात वादविवाद करत आले आहेत.

राजयोग विद्या माणसाला त्याच्या आंतरिक अवस्थेचं निरीक्षण करण्याचा उपाय दाखवते. त्या निरीक्षणाचे यंत्र मनच आहे. मनोयोगाच्या शक्तीचे योग्य नियमन करून तिला अंतर्जगताकडे वळवली जाते. तेव्हाच ती मनाचे विश्लेषण करू शकते. मग तिच्या प्रकाशात आपण समजू शकतो की आपल्या मनात काय चालले आहे. मनाची शक्ती इकडे-तिकडे विखुरलेल्या प्रकाशकणासारखी आहे. जेव्हा त्यांना एकत्रित केले जाते तेव्हा ती सगळे प्रकाशित करते. ज्ञान मिळवण्याचा हाच एकमेव उपाय आहे. बाहेरच्या जगात असो की अंतर्जगात, लोक याचाच उपयोग करतात. वैज्ञानिक ज्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा प्रयोग बाह्य जगतात करतात, मानसशास्त्रज्ञ त्याचा प्रयोग मनावर करतात. त्यासाठी खूप अभ्यास करावा लागतो. लहानपणापासून आपण बाह्य गोष्टींकडेच लक्ष द्यायला शिकलेलो असतो. आतील गोष्टींकडे लक्ष देण्याची शिकवण आपल्याला मिळालेली नाही. म्हणूनच आपल्यापैकी बरेच जणांची आपल्या मनाच्या क्रियांचे निरीक्षण करण्याची शक्ती नाहीशी झाली आहे. मनाला अंतर्मुखी करणे, त्याचा बाहेरच्या जगाकडे बघण्याचा ओढा कमी करणे, त्याची सगळी शक्ती एकवटून त्याचा

मनावर प्रयोग करणे म्हणजे तो त्याचा स्वभाव समजू शकेल. आपल्या स्वभावाचे विश्लेषण करू शकेल. हे अतिशय कठीण आहे, पण या विषयात वैज्ञानिक रीतीने पुढे जाण्यास हाच एकमेव उपाय आहे.

अशा प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग काय आहे? सगळ्यात आधी ज्ञान स्वत:च ज्ञानाचा सर्वोत्तम पुरस्कार आहे. त्याचे इतर उपयोगसुद्धा आहेत. ज्ञान आमची सगळी दु:खं दूर करील. मनुष्य आपल्या मनाचे विश्लेषण करता करता जेव्हा अशा वस्तूंचे दर्शन करतो जी कधी नष्ट होणार नाही, ज्याचे स्वरूप सतत पूर्ण व शुद्ध आहे, तेव्हा त्याला दु:ख राहात नाही. त्याचा सगळा विषाद न जाणे कुठे गायब होऊन जातो. सगळ्या दु:खाचे कारण भीती आणि अपूर्ण वासना आहेत. वर सांगितल्याप्रमाणे माणसाला स्वत:च्या खऱ्या स्वभावाचा साक्षात्कार झाल्यावर कळते की त्याचा मृत्यू कोणत्याही काळात होणार नाही. त्याला मृत्युभय रहात नाही. वासना राहात नाही. भीती आणि वासना नाहीशी झाल्यावर कोणतेही दु:ख राहात नाही. याच देहात परमानंदाची प्राप्ती होऊन जाते.

या ज्ञानप्राप्तीचा एकमात्र उपाय आहे, एकाग्रता. रसायनशास्त्रज्ञ प्रयोगशाळेत जातो. आपल्या मनाच्या सगळ्या शक्ती एकत्र करतो. ज्या वस्तूंचे विश्लेषण करायचे आहे, त्यावर प्रयोग करतो व त्याचे रहस्य जाणून घेतो. खगोलशास्त्रज्ञ मनाच्या सगळ्या शक्ती एकत्र करून दुर्बिणीतून आकाशाकडे पाहतो आणि सूर्य, चंद्र, तारे आपापले रहस्य त्याच्याजवळ प्रकट करतात. मी ज्या विषयावर बोलत आहे, त्या विषयात मी जितके मन लावू शकेन तितके त्या विषयाचे गूढ मी तुमच्यासमोर स्पष्ट करू शकेन. तुम्ही माझे बोलणे ऐकत आहात, तुम्ही जितके लक्ष देऊन ऐकाल, तितके स्पष्टपणे समजू शकाल.

मनाच्या शक्ती एकाग्र करण्याव्यतिरिक्त इतर कोणत्या पद्धतीने ज्ञान प्राप्त झाले आहे? प्रकृतीचे दार कसे ठोठवायचे, कसा आवश्यक तेवढाच धक्का मारायचा, हे आपल्याला कळले तर प्रकृती स्वत:च्या रहस्याची दारे आपल्यापुढे उघडते. त्या आघातासाठी लागणारी शक्ती आणि जोर एकाग्रतेतूनच मिळतो. मन व मनाच्या शक्तीला सीमा नाहीत. ते जितके अधिक एकाग्र होईल, तितकी एखाद्या वस्तूवर केंद्रित होण्याची त्याची शक्ती वाढेल. हेच यातील रहस्य आहे.

मनाला बाहेरच्या वस्तूवर स्थिर करणे सोपे आहे. कारण मन स्वभावत: बहिर्मुखी आहे. पण धर्म, मानसशास्त्र किंवा तत्त्वज्ञानाच्या बाबतीत असे नाही. इथे